
# Printing Area

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-79, Vol-04, August 2021



Editor

Dr.Bapu G.Gholap

Harshwardhan Publication Pvt Ltd.
International Multilingual Research Journal

ISSN 2394-5303

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**
Dr Gholap Bapu Ganpat
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**
289/55, Vasanthapuram,
ICMC, Chinna Thirupathy Post,
Salem- 636008 +919655554464
davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**
Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**
A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**
Associate Professor,Department of Marathi
Banaras Hindu University,
Varanasi-221005.(Uttar Pradesh)
Mobi. 9450533466
pbpadwal@gmail.com

# INDEX

01) Environmental Impacts on Life and Health of the Children
Dr. Manish kumar Mansukhbhai Jansari, Anand, Gujarat ||09

02) A STUDY ON GOODS AND SERVICES TAX IN INDIA
Rajanpreet Kaur, Hoshiarpur, Punjab ||16

03) Mulk Raj Anand's Novels & Humanism
Dr. Chhavi Sharma, Delhi ||21

04) An education profile of Punjab
Richa Sharma ||24

05) To Study of Challenges and Opportunities of Goods and Services Tax in India
Dr. Sanjay B. Shinde, Dist: Ahmednagar (MS), INDIA ||30

06) पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विदेशी भेटी (इ.स. २०१४ ते इ.स.२०१९) — एक ...
प्रा.यल्लावाड ज्ञानेश्वर प्रल्हाद, जि.लातूर ||35

07) सहकार तत्वज्ञान — काळाची गरज
सुभाष लक्ष्मण अहिरे & योगेश किरण हिरे, मालेगाव कॅम्प ||39

08) उस्मानाबाद जिल्ह्यातील भूमीवापर प्रारुपातील गतिमानतेचा भौगोलिक अभ्यास
डॉ. एफ. आर. पवार, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र) ||44

09) ना.घ. देशपांडे यांच्या कवितेतील व्यूहजाणीवा
प्रा. गणेश सावजी, जि. बुलडाणा ||46

10) वैश्विक पटल पर छाई कुछ महत्वपूर्ण क्रांतियाँ
ऋषभ सिंह, इटावा (उ०प्र०) ||49

11) वर्तमान परिदृश्य में महिलाओं का शिक्षा स्तर
कु० दीपमाला, नैनीताल (उत्तराखण्ड) ||52

12) भारतीय अर्थव्यवस्था के विकास के रास्ते पर विदेशी पूंजी के प्रभाव का अध्ययन
पूजा कुमारी, छपरा (बिहार) ||55

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

व इतर राष्ट्राबरोबर मैत्री व सहकार्याने
ांगत झाले. त्यातून भारताचा विकास होण्यास
आहे.

ंप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्रीय दौरे व भेटीमुळे
रणात गतिमानता, निश्चितता व ठामपणा
ताची ओळख सर्व जगभर पसरवली गेली
र्यंत भारत देश पोहचला नव्हता अशा
ुध्दा भारत देश पोहचला. उदा.मंगोलिया
डलेले प्रकल्पन, सीमावाद व समस्या
प्राधान्य दिले.उदा.भारत व बांग्लादेश
भू–सीमा करार याशिवाय चीनच्या
सर्वच राष्ट्राना भेटी देत भारताची सामरिक
क दाखवून दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदीनी
देत या राष्ट्रेसोबत, राजकीय, आर्थिक,
नरिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंध
करण्यावर भर दिला. थोडक्यात भारताचा
त व संरक्षण, मैत्री व सहकार्य, राष्ट्रप्रतिष्ठा
हेत व शक्तीत वाढ करण्यावर भर दिला


ेंद्र लेकुरवाले, पंतप्रधान नरेंद्र मोदीच्यार
भारताचे पराष्ट्रसंबंध), अथर्व प्रकाशन,

राष्ट्र टाईम्स, ३० ऑगस्टर २०१६.(नरेंद्र
ी दौऱ्यामुळे लाभ शक्य)
ैलेंद्र देवळणकर, भारताचे पराष्ट्र धोरण
काळ प्रकाशन, पुणे – २०१७ पृष्ठर क्र.२६
ा (मासिक), विद्याप्रसारक मंडळ, वर्ष
/एप्रिल–२०१५/ पृष्ठ् क्र.६७
/.pmindia.com
/.loksatta.com, लोकसत्ता, १८ में २०१७
पेक्षा भंग
त, ३१ मार्च २०१६ (परराष्ट्रीतय धोरणातील
रतासाठी अनुकूल)
त्ता, १८ मे २०१७ आणि लोकमत २८

जोगळेकर, भारताच्यो परराष्ट्र धोरणाची
काशन, ठाणे–२०१६
देवळाणकर, भारताचे पराष्ट्र धोरण
ळप्रकाशन, पुणे– २०१७ पृष्ठ–४१
र पृष्ठा क्र.४१–४२
भारत (सोलापुर) २१ एप्रिल २०१६
ारताचे परराष्ट् व संरक्षण संबंध)


**07**

# सहकार तत्वज्ञान – काळाची गरज


**सुभाष लक्ष्मण अहिरे**
सहाय्यक प्राध्यापक,
के.बी.एच. महाविद्यालय निमगाव

**योगेश किरण हिरे**
सहयोगी प्राध्यापक,
एम.एस.जी. महाविद्यालय मालेगाव कॅम्प


************

**प्रस्तावना**— प्राचीन काळापासून मानव हा समूहाने राहणारा एक समाजप्रिय प्राणी आहे. मानवाला आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते, इतरांचे सहकार्य घ्यावेच लागते. याच सहकार्याच्या वृत्तीमुळे आदिम काळापासून ते वर्तमान काळापर्यंत मानवाने आपली प्रगती करून घेतली. प्लेटो यांनी म्हटल्याप्रमाणे 'सहकाराशिवाय मानवी विकास अशक्य आहे.' त्यामुळेच मानवाने प्राचीन काळापासून सहकार्य वृत्तीला आत्मसात केलेले आहे .तसेच 'मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे' या अरिस्टॉटलच्या विधानानुसार समाजाशिवाय त्याला जगता येत नाही. अन्न, वस्त्र, निवारा इ. प्राथमिक मूलभूत गरजा भागवताना त्याला समाजावरच अवलंबून राहावे लागते. एकमेकांच्या सहकार्याशिवाय मानवी जीवनाचा उत्कर्ष होत नाही. म्हणून संत तुकाराम महाराजांच्या 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे अनादिकालापासून सहकार चालत आलेले आहे. आधुनिक कालखंडामध्ये मानवाला अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.या सामाजिक समस्यांना तोंड देण्यासाठी सहकार हा एकमेव पर्याय आहे. कारण सहकारामुळेच प्रेमभाव, मैत्री, जिव्हाळा, सहनशीलता, स्वावलंबन, स्वाभिमान, सहकार्य वृत्ती व सामूहिक विकास इत्यादी मुल्याचीं वाढ होते.

औद्योगिक क्रांतीच्या परिणामामुळे समाजव्यवस्थेत बदल झाले. कार्ल मार्क्सच्या विचारानुसार शोषित समाजाला शोषणापासून वाचवण्यासाठी सहकाराची गरज निर्माण झाली. त्यानुसार अठराव्या १८ व्या शतकापासून ते आजपर्यंत अनेक सहकारी संघटना निर्माण झाल्या. सहकारी चळवळ ही मागील १०० वर्षांत जलद गतीने पसरली. भौतिक देशात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सहकारी चळवळ रुजलेली आढळते. त्यात विकसित, अविकसित, विकसनशील, भांडवलशाही, साम्यवादी, लोकशाही, हुकूमशाही अशा सर्व राष्ट्रांचा समावेश आहे. सहकारी चळवळीने आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाचा एक प्रभावी मार्ग लोकांना दाखवून दिला. प्रस्तुत लघु शोधनिबंधात याच सहकारी चळवळीचा अर्थ पाहावयाचा आहे.

**सहकारी चळवळीची संकल्पना**

सहकार हा शब्द लॅटिन भाषेपासून आला असून याचा अर्थ म्हणजे 'एकाच उद्देशासाठी अनेक लोकांनी एकत्रित येऊन काम करणे होय.' सहकार संकल्पनेचा शब्द: अर्थ म्हणजे 'परस्पर सहकार्य करणे एकमेकांना मदत करणे किंवा सर्वांच्या हितासाठी संघटीत व एकत्रित काम करणे' असा आहे

**१. हेन्री डब्ल्यू.वूल्फ** :— यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास 'आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना सर्वार्थाने मुक्त करणारा अधिक उपयोगी प्रामाणिक व विश्वसनीय मित्र म्हणजे सहकारी सर्व मित्र होय.'

**२. ई. एस. बोगार्डस** :— यांनी म्हटल्याप्रमाणे समाज गटाचे जडणघडण ही सहकारी स्वरूपातील प्रक्रियेची निष्पत्ती आहे. सहकार अशी जीवनपद्धती आहे ज्यात लोकशाही मार्गाने लोक एकत्र येतात त्यांच्यात एकमेकांना मदत करण्याची भावना असते. विविध वस्तू तसेच सेवा सामान्य जणांना सुलभतेने व वाजवी विनिमयात उपलब्ध व्हाव्यात म्हणून अशा जनसमूह निष्ठेने काम करतो. अन्य विचारसरणी प्रमाणे सहकार केवळ आर्थिक विचार नाही तर एक जीवनशैली आहे

सहकार ही संज्ञा आणि त्यानुसार सहकाराचे रूप हे मर्यादित न राहता कृषी, अर्थ, उद्योग, व्यापार, शिक्षण इ. क्षेत्रात आता विस्तारलेले आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. सहकाराचा नेमका अर्थ देणे अवघड आहे, परंतु तरीही काही विचारवंतांनी दिलेल्या महत्त्वाच्या व्याख्या पाहणे गरजेचे आहे.

व्यक्तीने स्वेच्छेने एकत्र येऊन स्वत:च्या व स्वत:च्या आर्थिक हित संरक्षणासाठी व वृद्धीसाठी समतेच्या पायावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.—एच.कलवर्टन

समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी स्वेच्छेने संघटना स्थापन करण्यास प्रवृत्त करणारी एक चळवळ म्हणजे सहकार होय.— व्ही. एल. मेहता

वरील काही व्याख्या पाहता सर्वसाधारणपणे सहकार म्हणजे 'सहकारी संस्थेचे उद्दिष्ट सभासदांच्या हिताचे संरक्षण करणे हे असते'. तसेच भारताच्या सहकारी कायद्यानुसार 'सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंरक्षण व हितसर्वसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.'

सहकाराची संकल्पना आणि अर्थ अनेक समाजशास्त्रज्ञांनी व साम्यवाद्यांनी धार्मिक विचारवंतांनी, अर्थशास्त्रज्ञांनी व समाजसुधारकांनी आपल्या देशातील परिस्थितीनुसार मांडला आहे. सहकार या शब्दाचा ढोबळ अर्थ असा होतो की अनेकांनी एकत्र येऊन परस्परांच्या सहकार्याने केलेले कार्य होय. 'सह' म्हणजे बरोबर व 'कार्य' म्हणजे काम. यालाच स्वखुशीने केलेल्या कामाला सहकार म्हणतात.

एच कॅलव्हर्ट यांच्यामते व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधांच्या उन्नतीसाठी समतेच्या तत्त्वावर निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय. तसेच प्रा.स्ट्रीकलंड यांच्या मते सहकार म्हणजे संयुक्त प्रयत्नांनी एक सामान्य गाठण्यासाठी एकत्रित आलेल्या व्यक्तींचा समूह किंवा गट म्हणजे सहकार होय.

सहकारात प्रामुख्याने भांडवलापेक्षा व्यक्तीच्या सहयोगाचा अधिक महत्त्व असते. त्यात लोक स्वेच्छेने एकत्र येतात सहकारी संस्था या प्रामुख्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटाचा विकास करण्यासाठी असतात. नफा कमविणे हे उद्दिष्ट नसते. तर तिथे नीती मूल्यांना

अधिक वाव असतो सर्वांना समान दर्जा, सर्वांना समान संधी, सर्वांना समान महत्त्व व सेवाभावाला अधीक महत्त्व असते तसेच व्यक्तीपेक्षा समूह हिताला अधिक महत्त्व असते.

**सहकाराची उद्दिष्टे**

सहकार सर्व जेव्हा लोक एकत्र येतात त्यात त्यांनी स्थापन केलेली संघटना काही उद्दिष्टांवर आधारित असते ते उद्दिष्टे खालीलप्रमाणे.

**समान ध्येय :—** जेव्हा समाजातील काही व्यक्तींचे ध्येय एकच असते. तेव्हा ते ध्येय गाठण्यासाठी व त्यातून आपला विकास साध्य करण्यासाठी लोक एकत्र येतात. उदा.दूध व्यवसाय, साखर व्यवसाय, शिक्षण संस्था इ.क्षेत्रातील व्यक्ती एकत्र येऊन या संस्था स्थापन करतात.

३. **समाजसेवा लोककल्याण हेच उद्दिष्ट :—** सहकार क्षेत्राचा उद्देश अधिक नफा मिळवायचा नसतो. तर समाजात राहणाऱ्या लोकांचे लोककल्याण सेवाभाव यावरच अधिक भर दिला जातो.आलेल्या नफ्याचे समान भागात वाटप करण्यात येते.

४. **परस्पर सहकार्य :—**सहकाराची चळवळ मुख्य: परस्पर सहकार्यावर अवलंबून आहे. हे परस्पर सहकार्य नसेल तर सहकाराचा काही अर्थ उरत नाही. या ठिकाणी वैयक्तिक स्वार्थाला कोणत्याही प्रकारचे स्थान नसते. परस्पर सहकार्य हाच सेवाभाव असतो.

५. **सर्वांगीण विकास :—**आर्थिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तीला व्यक्तिगत गरजा, उद्दिष्टे साध्य करणे अशक्य असते. कारण साधन सामुग्री अपुरी असते. अशा सर्व घटकांनी मिळून सहकारी संस्थेच्या रूपाने एक संघटित शक्ती उभारली जाते. त्यातून मिळणाऱ्या गरजा, उत्पन्न हे सर्वांसाठी असल्याने प्राथमिक व भविष्यकालीन अडचणी सोडवण्यास मदत होऊन सर्वांगीण विकास साधला जातो.

६. **लोकशाही पद्धतीचा कारभार :—** सहकारी चळवळीतील सदस्यांचे हक्क हे समान स्वरूपाचे असतात. सर्वांची जबाबदारी देखील सामूहिक असते. यासाठी सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते. लोकशाही प्रणालीतून व्यवस्थापन मंडळ निवडतात बहुमताला न्याय मिळतो.

७. **समान दर्जा :—**सहकारात सहभागी असलेल्या सर्व सभासदांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही श्रीमंत, गरीब, जात, वर्ग, धर्म असा भेदभाव केला जात नाही. सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली जाते.

**सहकार चळवळ लोकचळवळ होणे ही काळाची गरज**

सहकार चळवळ ही लोकचळवळ होणे ही काळाची गरज असून यासाठी सहकारी संस्था आणि आपल्यामध्ये परस्पर समन्वय, पूरकता आणि आपुलकीची भावना असणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत ही आज एक लोकचळवळ झाली आहे तसेच येणाऱ्या काळात सहकार चळवळ लोकचळवळ होणे आवश्यक असून यामुळेच सहकारी क्षेत्रासमोरील प्रश्नांची सोडवणूक होऊ शकेल. उदारीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या रेट्यमध्ये आर्थिक क्षेत्राला सहकारी चळवळच पर्याय ठरू शकते. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये सहकार हा एक समर्थ पर्याय आहे. सहकारी चळवळीतील आपण सर्वांनी एकत्र येण्याची, सुसंस्कारित होण्याची आणि सहकार चळवळीची व्याप्ती व सक्षमता प्रदर्शित करण्याची हीच वेळ असून असे करीत असताना यामध्ये महिला आणि युवकांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे.

भारतामध्ये सहकार चळवळ आजही फार मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. प्रामुखाने महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात सहकार चळवळ रुजली आणि मोठ्या स्वरूपात वाढलेली दिसते. महाराष्ट्रातील सहकार चळवळीत अनेक थोर नेत्रांचा सहभाग आहे. त्रामध्ये वसंतदादा पाटील, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, धनंजर गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, गुलाबराव पाटील, अण्णासाहेब गोडबोले, लक्ष्मणराव इनामदार, डॉ. आचार्य, वसंतराव देवपुजारी अशा सर्व व्रक्तींचे मोठे रोगदान सहकार चळवळीत आहे आणि त्रामुळेच महाराष्ट्रातील जनता रा सर्वांची ऋणी राहील.

सहकार चळवळीचा उगम महाराष्ट्रात झाला आणि सर्वाधिक महाराष्ट्रात क्षेत्राने चांगली कामगिरी केलाचे दिसून रेते.

आज महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या

दोन लाखांवर संस्था दिमाखात चालू आहेत. यामध्ये विशेषत: सहकारी बँक, पतपेढी, शिक्षण, दुग्ध, साखर, मत्स्य, गृहनिर्माण, आरोग्य, ग्राहक सेवा आणि इतर पूरक सेवा संस्था यांचा समावेश होतो. सहकार चळवळीतील महाराष्ट्रातील आर्थिक क्षेत्रातील लेखाजोखा मांडायचा झाल्यास आजमितीस अवघ्यास ५०० सहकारी बँका, १४००० हजार पतपेढ्या चांगल्या स्थितीत कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील १९ बँका अशा आहेत की ज्यांनी शतक महोत्सव साजरा केला आहे. महाराष्ट्रातील आर्थिक सुधारणेला सर्वात मोठे पाठबळ आज सहकार क्षेत्रामुळेच आहे. आज आपणास 'सहकारातून ग्राम विकास' पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र समृद्ध असल्यामुळेच महाराष्ट्रातील आर्थिक व्यवस्था बळकट राहू शकते. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रामुळे अनेक फायदे जनतेला लाभले आहेत. ग्रामीण भागातील सर्व सामान्यांच्या विकास आणि अर्थव्यवस्थेला चालना सहकार क्षेत्रामुळेच मिळाली आहे. आमच्या शेतकरी बांधवांचे उत्पादन प्रोसेस करून इतर उत्पादने तयार करण्याचे काम सहकारी तत्त्वावरील उद्योगांनी केले आहे. उदा., सहकारी दूध डेअरीमध्ये दूध विक्रीबरोबर दही, लोणी, तूप, पनीर इ. पूरक पदार्थ यांची विक्री करून ग्राम विकास साधला आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील, ज्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली राहण्यास सहकार क्षेत्राने हातभार लावला आहे.महाराष्ट्रात लाखो लोकांना सहकार क्षेत्राने रोजगार उपलब्ध करून दिले आहेत आणि आजही सहकार क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. मा. श्री. नरेंद्र मोदी यांचे सरकार केंद्रस्थानी आलापासून गेल्या तीन वर्षात अनेकविध बदलांची सुरुवात झाली आहे. त्यामध्ये मुख्यत: डीजिटायझेशन म्हणजे सर्व व्यवहार इंटरनेटच्या माध्यमातून करणे बंधनकारक केले आहे. विशेष करून ग्रामीण भागातील सहकार क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाले आहे. यामुळे

**इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी**

विषयात ज्ञान असलेल्या असंख्य तरुणांना सहकार क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील छोट्या बँका किंवा पतपेढ्यांमुळे तेथील लहान उद्योगांना अर्थसहाय्य उपलब्ध झाला आहे आणि यामुळे तेथील अर्थव्यवस्थेला मोठी मदत मिळत आहे. महाराष्ट्रातील महिला बँका स्थानिक महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मदत करीत आहेत, तसेच विकास यांना सहकारी बँकांमुळे पाठबळ मिळाले आहे.

शहरी भागातील कला क्षेत्रातील संस्था व उद्योगांना सहकार क्षेत्राची भरीव मदत असल्यामुळे या संस्थांची वाट सुकर झाली आहे. सहकारी शिक्षण संस्थांमुळे ग्रामीण भागातील तरुणांना शिक्षण घेता आले. यामुळेच असंख्य ग्रामीण भागातील तरुण शिक्षण घेऊन जगभरात कार्यरत आहेत. परंतु ज्याप्रमाणे सहकार क्षेत्रामुळे खूप मोठ्या प्रमाणात फायदे झाले, तसे तोटेही सहन करावे लागले. यामुळे सहकार क्षेत्र काही व्यक्तींमुळे बदनामही झाले. सहकारी संस्थेत आलेल्या पैशाचे योग्य नियोजन न केल्याने अथवा भ्रष्टाचार केल्याने काही संस्था बंद कराव्या लागल्या आणि या भागातील सामान्य नागरिकांचे हाल झाले. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी सक्षम संगणकीकरण करणे अपेक्षित आहे. तसेच सहकारी कायद्यात बदल अपेक्षित आहे. सहकार क्षेत्रात नोकरी करणाऱ्या व्यक्तींना याविषयी पुरेसे प्रशिक्षण दिले जात नाही. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे नोकरी करणाऱ्या व्यक्तींचा आत्मविश्वास वाढत नाही. म्हणूनच सहकारी संस्थांची ज्या प्रमाणात वाढ झाली पाहिजे, तेवढी होत नाही. याला सर्वस्वी संस्थेची कार्यकारिणी जबाबदार आहे.

सर्वात मोठा तोटा सहकारी संस्थांना होतो, तो पक्षीय राजकारणामुळे. सहकारी संस्था चालवताना पक्ष राजकारण न आणता संस्थेची वाढ कशी होईल याकडे लक्ष दिल्यास, या विभागातील सर्वसामान्यांना फायदा होईल असे वाटते. उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आर्थिक क्षेत्राला सहकारी चळवळ पर्याय असू शकते. मुक्त अर्थव्यवस्थेला सहकार हा एक समर्थ पर्याय आहे. परंतु आवश्यकता आहे ती सहकारी चळवळीतील चांगले कार्यकर्ते एकत्र करण्याची आणि सुसंस्कारित होण्याची, तसेच सहकार चळवळीची व्याप्ती व सक्षमता प्रदर्शित करणाची!

**सहकारातील उणीवा काय व त्यावर उपाय**

सहकाराची झालेली वाढ हि केवळ संख्यात्मक

वाढ होती, गुणात्मक नव्हती असे नाईलाजाने म्हणावे लागते कारण सहकाराचे वरील फायदे बघीतल्यास आपल्या समाजाची जी काही प्रगती व्हायला पाहीजे ती झालेली नाही. पहिल्यांदा सहकारी तत्वावर पतपेढ्या शेतकऱ्याला सावकारी पेचातून बाहेर काढण्यासाठी निर्माण झाल्या. शेतकरी सावकारी कर्जातून पिळून निघत होता. आजही तिच परिस्थिती आपण बघतो. शेतकरी आजही आत्महत्या करत आहेत. ग्राहक आजही बाजवी भावात माल मिळवू शकत नाही. नोंदणी झालेल्या सहकारी संस्था जास्त आहेत व कामे करणाऱ्या कमी सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद हा सहकाराची तत्वे बाणणारा पाहीजे. अनेकांना सहकारी संस्था ही काहीतरी नैतीक अधिष्ठान असणारी संस्था आहे हेच मान्य नसते. सहकारी संस्थेतील संचालक, अधिकारी, सेवक मनाला येईल तसे निर्णय घेतात. त्यामुळे दुसऱ्या पक्षावर अन्याय होतो.

अकार्यक्षम संस्था, थकबाकीचे वाढते प्रमाण, भ्रष्टाचार, नियम न पाळण्याची वृत्ती आदी बाबी सहकारास मारक आहेत. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी थकबाकी राहू नये व थकबाकी वसूल करण्याबाबत जे काही वक्तव्य केले होते त्याची सत्यता आज पटू लागली आहे. आज अनेक सहकारी तत्वावर चालणार्या बँका केवळ थकबाकी जास्त आहे या कारणामुळेच बंद पडत आहेत. सहकार चळवळ हि राजकिय व्यक्ती व स्वार्थी लोकांच्या हातातले बाहूले बनले आहे. सहकारातील बर्याच व्यक्ती या राजकिय, व्यापारी असतात. त्यांना सहकाराबद्दल फारशी आस्था नसते. आपल्याच लोकांना कर्जपुरवठा करणे, आपलाच माल विक्रिला ठेवणे, भ्रष्टाचार, आपल्याला अनुकूल नियम बनवणे आदी गोष्टी ते अवलंबतात. त्याने मुळ सहकाराच्याच तत्वाला हरताळ फासला जातो. ज्यास कर्ज हवे त्यास मिळत नाही.

असे म्हणतात की पुर्वी संचालक बैठकीच्या वेळी जो काही चहापानाचा खर्च येत असे तो खर्च संचालक मंडळ आपल्या खिशातून देत असे. आताच्या काळात असे पहावयास मिळेल का?

सहकारी संस्थांत अनेक संधीसाधू, दलाल, सावकारांचे वर्चस्व आहे. निष्ठावंत नेते, कार्यकर्ते आदी मागे पडत आहेत. आपल्या सरकारचे धोरणही याला काहीप्रमाणात कारणीभूत आहे. प्रत्येक राज्य सहकाराकडे वेगवेगळ्या नजरेने बघते. कायद्याने वेळकाढूपणा स्विकारला आहे. धडाडीचे निर्णय घेतले जात नाही. नियमांबाबत चालढकल केली जाते. संस्थेचे आर्थीक परिक्षण काटेकोर पणे केले जात नाही. यामुळे सहकारी संस्थेची वाढ निकोप होत नाही.

सहकारी चळवळ भारतात असमान वाढीस लागलेली आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक व उत्तर प्रदेशात काही प्रमाणात ही चळवळ जोमात आहे. पुर्वेकडील राज्यांत तर ही चळवळ नावालाच आहे. सहकारी संस्थांमध्ये परस्पर सहकार्याचा अभाव दिसतो. उदा. छोट्या ग्राहक दुकानांनी लागणारा माल मध्यवर्ती ग्राहक भांडारातून घ्यावा, मध्यवर्ती ग्राहक भांडाराने राज्य ग्राहक भांडारातून तर त्यांनी राष्ट्रीय ग्राहक भांडारातून माल घ्यावा हे मार्गदर्शक तत्व कोणी पाळत नाही तर सगळे खाजगी व्यापार्यांकडून माल घेतात. आकडेवारी असे सांगते की राष्ट्रीय व्यापारी उलाढालीत सहकाराचा वाटा जेमतेम १०% आहे. सहकारी संस्थेतील सभासदांना सहकाराची तत्वे, शिक्षण देण्याची नियमात तरतूद आहे. किती संस्था आपल्या सभासदांना हे शिक्षण देतात? प्रमाण फारच नगण्य आहे. बहूतेक संस्था या हितसंबंधी गटाकडे आहेत. त्या स्वार्थी पद्धतीने चालवल्या जातात. सदोष कर्जवाटप व वाटप झालेली कर्जे वसूल न करणे ही सहकारी संस्थांना लागलेली किड आहे. अकूशल राजकिय नेतृत्व, भ्रष्टाचार, सहकारी संस्था म्हणजे खाजगी मालमत्ता अशी प्रवृत्ती बळावते आहे.

सहकारी चळवळ राजकिय व्यक्तिंच्या हातात न जावू देणे, चांगल्या धोरणास सरकारचा पाठींबा, थकित कर्जवसूली, लोकशिक्षण, धडाडी आदी काही धोरणे प्रभावीपणे अवलंबली नाहीत तर सहकारी चळवळीची स्वाहकारी चळवळ लवकरच बनेल.

## संदर्भ सूची


चौगुले,व्ही.टी. पठाण,के.जी., भारतातील सहकार चळवळ,कॉन्तिनेटल प्रकाशन,पुणे.

भोसले, के.एम., दामजी, वी.एम., सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६.

कामत,गो.स.,सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९३.

Dr.Houghs E.M.,Cooperative movement in india, Oxford University Press, London,1960.